जनेप न्यास JNPT

सत्यमेव जयते

# वाढवण बंदर



## संधींचा अथांग सागर

नवीन बंदराच्या विकासामुळे स्थानिक रहीवाशी यांची भरभराट होउन, जीवनमान उंचावले आहे आणि देशाच्या प्रगतीला हातभार लागला आहे, याला इतिहास साक्ष आहे.  वाढवण बंदराच्या निर्मितीमुळेही स्थानिक रहिवाशांना, अमर्यादित संधी उपलब्ध होउन, कुटुंबातील प्रत्येक घटकाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.

## आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बंदरासाठी लागणारी वैशिष्ट्य लाभलेला वाढवणचा किनारा :

भौगोलिक वैशिष्ट्यांमुळेच वाढवण किनाऱ्याची बंदरासाठी निवड अपरिहार्य बनली आहे. वाढवण बंदर झाल्यास ते  प्रमुख आंतरराष्ट्रीय बंदरात आपले स्थान निर्माण करू शकेल आणि वाढवण गावाचे जगाच्या नकाशात एक सन्मानाचे स्थान असेल.

- **समुद्राची खोली/Draft:** या बंदराच्या परिसरात समुद्राची खोली/Draft नैसर्गिक रित्या अधिक असल्यामुळे मोठ्या जहाजांची हाताळणी करणे सोपे जाईल.
- **सरकारी जागा:** समुद्रातील भरती– ओहोटी क्षेत्रातील सरकारी जमिनीवर भराव टाकून बंदराचा विकास केला जाणार आहे. म्हणूनच बंदर होताना कोणत्याही खाजगी जमीनीचे भुसंपादन केले जाणार नाही
- **घरांचे संरक्षण:** बंदराचा विकास होत असताना गावांचे किंवा घरांचे स्थलांतरण करावे लागणार नाही.
- **संवर्धन आणि संरक्षण:** बंदराच्या आवारातील खारफुटी आणि कॅसुरीना वृक्षांची काळजी घेतली जाणार आहे.
- **खाजगी जमीनीची सुरक्षा:** बंदराच्याफक्त रस्ते आणि रेल वाहतूकीसाठी महसूल आणि वन जमिनी वापरल्या जातील त्यामुळे खाजगी जमिनींचा उपयोग कमीत कमी करण्यात येईल.
- **नोकरी, व्यवसाय, रोजगार:** बंदरामध्ये आणि त्याच्याशी संबंधित उद्योगात स्थानिक रहिवाशांनाच नोकरी, व्यवसाय, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- **मंदिर:** शंखोदर या पौराणिक मंदिराचे जतन करून त्याचा जीर्णोद्धार करून ते स्थानिक लोकांसाठी प्रचलित प्रथेनुसार खुले ठेवण्यात येणार आहे.

**टीप:**

स्वतःच्या स्वार्थासाठी काही लोक, स्थानिक लोकांना भुलवण्यासाठी अप्रचार तसेच अफवा पसरवत आहेत. आपल्याला विनंती आहे की अशा अप्रचाराला आणि अफवांना बळी पडू नका. खऱ्या माहितीसाठी कृपया पुढील वेबसाईट पहावी. http://jnport.gov.in/vadhavan_port अथवा  JNPT चे मॅनेजर श्री. विश्वनाथ ग. घरत यांच्याशी संपर्क साधावा. इ मेल– vishwanathgharat@jnport.gov.in

## बंदराच्या विकासाला लवकरच होणार प्रारंभ :

**वाढवण बंदराच्या विकासाला  पर्यावरण, हवामान तसेच वन मंत्रालयाकडून ना- हरकत पर्यावरण मंजुरी (EC) मिळाली असून आवश्यक परवानग्या  प्राप्त झाल्यानंतर आणि प्रारंभिक कामे पूर्ण केल्यानंतरच बंदराच्या विकासकार्याला खऱ्या अर्थाने सुरुवात करता येईल-**

- महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन (MCZM) यांच्याकडून CRZ ला मंजुरी मिळवणे.
- बंधाऱ्यांची निर्मिती करणे
- मंत्रालयाकडून ना- हरकत पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र मिळवणे
- वीजपुरवठ्याची व्यवस्था करणे
- बंदराकडे जाणारा स्वतंत्र रस्ता तयार करणे
- पाणीपुरवठासाठी पाईपलाईनची व्यवस्था करणे
- रेल्वे मार्गाची निर्मिती करणे
- कार्गो बर्थची निर्मिती करणे

**टीप:**

कृपया अधिक माहितीसाठी पुढील वेब साईट वर जावे JNPT चे मॅनेजर श्री. विश्वनाथ ग. घरत यांच्याशी संपर्क साधावा. इ मेल– vishwanathgharat@jnport.gov.in

## बंदर निर्मितीमुळे पर्यावरणाला कोणताही धोका नाही :

बंदराचा विकास होत असताना, पर्यावरणाची काळजी घेण्याच्या उद्देशाने सखोल आणि विशेष अभ्यास करून स्थानिक रहिवाश्यांच्या फायद्यासाठी पर्यावरण व्यवस्थापनाच्या योजना बनवण्यात आल्या आहेत.

**• पर्यावरण प्रभाव मूल्यांकन • पर्यावरण व्यवस्थापन योजना • आपत्ती व्यवस्थापन योजना**

## पूर्ण झालेले आणि आयोजित केलेले अभ्यास :

1) गाळ उपसणीचा पाण्याच्या प्रवाहावर होणाऱ्या परिणामाचा सखोल अभ्यास
2) चक्रीवादळामुळे खाडी व नियंत्रण क्षेत्रात येणाऱ्या पुराचा आणि इतर परिणामांचा अभ्यास
3) सागरी पर्यावरणावर गाळ उपसणी आणि टाकाऊ कचऱ्यामुळे होणाऱ्या परिणामाचा अभ्यास
4) वतृत जैवववधता याचा भाव मूयांकन अहवाल आण यवथापन योजना
5) बंदर निर्माण करताना समुद्राखालीला विकास कार्यामुळे होणाऱ्या आवाजाचा समुद्री जीवांवर होणारा परिणाम तपासणे.
6) भरती आणि ओहोटीच्या वेळी समुद्राच्या पाण्यामध्ये होणारे पेट्रोलीयं हायड्रोकार्बनचे संकेंद्रीकरण करणे
7) सर्व प्रकाच्या विकास कामांचे आणि वाढत्या नागरिकीकण्याचे एकत्रितपणे मूल्यांकन करणे
8) मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या लहान रस्त्यांवरील रहदारी आणि गर्दीचा अंदाज घेणे
9) अभ्यासासाठी बंदराच्या हद्दीतील आणि डहाणू खाडीतील भरती–ओहोटी आणि पाण्याच्या प्रवाहाची गती यांची माहिती संग्रहित करणे
10) CWPRS च्या अभ्यासासाठी परिसरातील हवा आणि समुद्री लाटांविषयी माहिती संपादन करणे
11) विकास होऊ घातलेल्या वाढवण बंदराचा किनाऱ्यावरील मत्स्यपालनावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करणे

**टीप**

काही लोक किनारपट्टीवरील गावकऱ्यामध्ये अफवा व भीती पसरवत आहेत की बंदराच्या निर्मितीनंतर त्यांच्या घरात पाणी शिरेल आणि त्यांना विस्थापित व्हावं लागेल. कोणत्याही आधाराविना हा अप्रचार केला जातोय. आजही मुसळधार पावसात, भरतीच्या वेळी फक्त गावात पाणी शिरते, घरात नाही. तसेच बंदर निर्मितीनंतरही घरात पाणी शिरणार नाही व कोणालाही विस्थापित व्हावे लागणार नाही याची खात्री आम्ही देतो.}

जनेप न्यास JNPT

सत्यमेव जयते

# वाढवण बंदर

## संधींचा अथांग सागर

नवीन बंदराच्या विकासामुळे स्थानिक रहीवाशी यांची भरभराट होउन, जीवनमान उंचावले आहे आणि देशाच्या प्रगतीला हातभार लागला आहे, याला इतिहास साक्ष आहे.  वाढवण बंदराच्या निर्मितीमुळेही स्थानिक रहिवाशांना, अमर्यादित संधी उपलब्ध होउन, कुटुंबातील प्रत्येक घटकाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.

## आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बंदरासाठी लागणारी वैशिष्ट्य लाभलेला वाढवणचा किनारा :

भौगोलिक वैशिष्ट्यांमुळेच वाढवण किनाऱ्याची बंदरासाठी निवड अपरिहार्य बनली आहे. वाढवण बंदर झाल्यास ते  प्रमुख आंतरराष्ट्रीय बंदरात आपले स्थान निर्माण करू शकेल आणि वाढवण गावाचे जगाच्या नकाशात एक सन्मानाचे स्थान असेल.

- **समुद्राची खोली/Draft:** या बंदराच्या परिसरात समुद्राची खोली/Draft नैसर्गिक रित्या अधिक असल्यामुळे मोठ्या जहाजांची हाताळणी करणे सोपे जाईल.
- **सरकारी जागा:** समुद्रातील भरती- ओहोटी क्षेत्रातील सरकारी जमिनीवर भराव टाकून बंदराचा विकास केला जाणार आहे. म्हणूनच बंदर होताना कोणत्याही खाजगी जमीनीचे भुसंपादन केले जाणार नाही
- **घरांचे संरक्षण:** बंदराचा विकास होत असताना गावांचे किंवा घरांचे स्थलांतरण करावे लागणार नाही.
- **संवर्धन आणि संरक्षण:** बंदराच्या आवारातील खारफुटी आणि कॅसुरीना वृक्षांची काळजी घेतली जाणार आहे.
- **खाजगी जमीनीची सुरक्षा:** बंदराच्याफक्त रस्ते आणि रेल वाहतूकीसाठी महसूल आणि वन जमिनी वापरल्या जातील त्यामुळे खाजगी जमिनींचा उपयोग कमीत कमी करण्यात येईल.
- **नोकरी, व्यवसाय, रोजगार:** बंदरामध्ये आणि त्याच्याशी संबंधित उद्योगात स्थानिक रहिवाशांनाच नोकरी, व्यवसाय, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- **मंदिर:** शंखोदर या पौराणिक मंदिराचे जतन करून त्याचा जीर्णोद्धार करून ते स्थानिक लोकांसाठी प्रचलित प्रथेनुसार खुले ठेवण्यात येणार आहे.

**टीप:**

स्वतःच्या स्वार्थासाठी काही लोक, स्थानिक लोकांना भुलवण्यासाठी अप्रचार तसेच अफवा पसरवत आहेत. आपल्याला विनंती आहे की अशा अप्रचाराला आणि अफवांना बळी पडू नका. खऱ्या माहितीसाठी कृपया पुढील वेबसाईट पहावी. http://jnport.gov.in/vadhavan_port अथवा  JNPT चे मॅनेजर श्री. विश्वनाथ ग. घरत यांच्याशी संपर्क साधावा. इ मेल- vishwanathgharat@jnport.gov.in

## बंदराच्या विकासाला लवकरच होणार प्रारंभ :

**वाढवण बंदराच्या विकासाला  पर्यावरण, हवामान तसेच वन मंत्रालयाकडून ना- हरकत पर्यावरण मंजुरी (EC) मिळाली असून आवश्यक परवानग्या  प्राप्त झाल्यानंतर आणि प्रारंभिक कामे पूर्ण केल्यानंतरच बंदराच्या विकासकार्याला खऱ्या अर्थाने सुरुवात करता येईल-**

- महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन (MCZM) यांच्याकडून CRZ ला मंजुरी मिळवणे.
- बंधाऱ्यांची निर्मिती करणे
- मंत्रालयाकडून ना- हरकत पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र मिळवणे
- वीजपुरवठ्याची व्यवस्था करणे
- बंदराकडे जाणारा स्वतंत्र रस्ता तयार करणे
- पाणीपुरवठासाठी पाईपलाईनची व्यवस्था करणे
- रेल्वे मार्गाची निर्मिती करणे
- कार्गो बर्थची निर्मिती करणे

**टीप:**

कृपया अधिक माहितीसाठी पुढील वेब साईट वर जावे JNPT चे मॅनेजर श्री. विश्वनाथ ग. घरत यांच्याशी संपर्क साधावा. इ मेल- vishwanathgharat@jnport.gov.in

## बंदर निर्मितीमुळे पर्यावरणाला कोणताही धोका नाही :

बंदराचा विकास होत असताना, पर्यावरणाची काळजी घेण्याच्या उद्देशाने सखोल आणि विशेष अभ्यास करून स्थानिक रहिवाश्यांच्या फायद्यासाठी पर्यावरण व्यवस्थापनाच्या योजना बनवण्यात आल्या आहेत.

**• पर्यावरण प्रभाव मूल्यांकन • पर्यावरण व्यवस्थापन योजना • आपत्ती व्यवस्थापन योजना**

## पूर्ण झालेले आणि आयोजित केलेले अभ्यास :

1) गाळ उपसणीचा पाण्याच्या प्रवाहावर होणाऱ्या परिणामाचा सखोल अभ्यास
2) चक्रीवादळामुळे खाडी व नियंत्रण क्षेत्रात येणाऱ्या पुराचा आणि इतर परिणामांचा अभ्यास
3) सागरी पर्यावरणावर गाळ उपसणी आणि टाकाऊ कचऱ्यामुळे होणाऱ्या परिणामाचा अभ्यास
4) वतृत जैवववधता याचा भाव मूयांकन अहवाल आण यवथापन योजना
5) बंदर निर्माण करताना समुद्राखालीला विकास कार्यामुळे होणाऱ्या आवाजाचा समुद्री जीवांवर होणारा परिणाम तपासणे.
6) भरती आणि ओहोटीच्या वेळी समुद्राच्या पाण्यामध्ये होणारे पेट्रोलीयं हायड्रोकार्बनचे संकेंद्रीकरण करणे
7) सर्व प्रकाच्या विकास कामांचे आणि वाढत्या नागरिकीकण्याचे एकत्रितपणे मूल्यांकन करणे
8) मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या लहान रस्त्यांवरील रहदारी आणि गर्दीचा अंदाज घेणे
9) अभ्यासासाठी बंदराच्या हद्दीतील आणि डहाणू खाडीतील भरती-ओहोटी आणि पाण्याच्या प्रवाहाची गती यांची माहिती संग्रहित करणे
10) CWPRS च्या अभ्यासासाठी परिसरातील हवा आणि समुद्री लाटांविषयी माहिती संपादन करणे
11) विकास होऊ घातलेल्या वाढवण बंदराचा किनाऱ्यावरील मत्स्यपालनावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करणे

**टीप**

काही लोक किनारपट्टीवरील गावकऱ्यामध्ये अफवा व भीती पसरवत आहेत की बंदराच्या निर्मितीनंतर त्यांच्या घरात पाणी शिरेल आणि त्यांना विस्थापित व्हावं लागेल. कोणत्याही आधाराविना हा अप्रचार केला जातोय. आजही मुसळधार पावसात, भरतीच्या वेळी फक्त गावात पाणी शिरते, घरात नाही. तसेच बंदर निर्मितीनंतरही घरात पाणी शिरणार नाही व कोणालाही विस्थापित व्हावे लागणार नाही याची खात्री आम्ही देतो.}

## वाढवण येथे बंदराच्या विकासामुळे तारापूर अणुऊर्जा केंद्राच्या (TAPS) सुविधांवर कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत:

वाढवण बंदराच्या विकासामुळे तारापूर अणुऊर्जा केंद्रात वीजनिर्मितीसाठी ज्या सागरी प्रवाहातून पाणी घेतले जाते किंवा ज्या ठिकाणी अनुपयुक्त पाण्याचा विसर्ग केला जातो त्यावर, तसेच TAPS च्या समुद्रातील संचमांडणीच्या सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांबद्दल तारापूर अणुऊर्जा केंद्राशी विस्तृत चर्चा करण्यात आली आहे. त्यातून मिळालेल्या माहितीवर, नीट अभ्यास करण्यात आले.

1) CWPRS च्या क्रमांक 5667 अहवालानुसार प्रस्तावित वाढवण बंदराच्या विकासाचा, JN PORT साठी TAPS मध्ये होणाऱ्या गाळ संचयाच्या प्रक्रियेवर होणारा परिणाम, गणितीय परिमाणानुसार अभ्यासला आहे.
2) विकसित होणाऱ्या वाढवण बंदरातून होणारी संभाव्य तेल गळती याचा अंदाज घेणे आणि TAPS च्या दिशेने होऊ शकणाऱ्या संभाव्य प्रसाराचा INCOIS द्वारा काल्पनिक शक्यतेच्या आधारावर मूल्यमापन केले गेले आहे.
3) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर तयार होणारे नवीन वाढवण बंदर हे तारापूर अणुऊर्जा केंद्रापासून 12 किमी उत्तरेस आहे. याभागात वाहतूक करणाऱ्या जहाजांचे ड्रिलिंग अथवा संभाव्य टक्कर याविषयी S.V.S. Marine Services Pvt. Ltd. कडून अभ्यास करण्यात आला आहे.
4) Fine Environtech च्या माध्यमातून TAPS च्या नैसर्गिक विकास प्रदेश तसेच आपत्कालीन नियोजन प्रदेशावर होणाऱ्या परिणांचाही अभ्यास करण्यात आला आहे.

**या सर्व अभ्यासानंतर, वाढवण बंदराच्या विकासामुळे TAPS वर कोणताही पद्धतीचा विपरीत परिणाम होणार नाही अशी शिफारस करण्यात आली आहे, तसेच अणुऊर्जा मंत्रालयाकडून विकासाला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.**

**टीप:**
आपल्या स्वार्थासाठी काही खोटे भुरटे लोके, वाढवण बंदराच्या विकासामुळे तारापूर ऊर्जा प्रकल्प धोक्यात येणार आहे अशी भीती लोकांच्या मनात पसरवत आहेत. हा खोटा प्रचार थांबायला हवा कारण खुद्द अणुऊर्जा मंत्रालयाने बंदराच्या विकासाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेऊ नका ही कळकळीची विनंती.

# एका विकासचक्राची सुरुवात पिढ्यांपिढ्यांची भरभराट




## वाढवण बंदर एक वाढवेल रोजगार अनेक:

वाढवण बंदरच्या विकासामुळे, बंदरात तसेच त्याच्या सभोवताली नोकरीच्या, रोजगाराच्या, व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होतील. सध्या जे कमी शिक्षित आहेत, त्यांच्यासाठी, ड्राइवर, मेकॅनिक्स, पेंटर, कारपेंटर, इलेक्ट्रिशन, वॉचमन, कॉम्पुटर ऑपरेटर अशा आणि इतर अनेक जागा निर्माण होणार आहेत आणि उच्च शिक्षितांसाठी व्यवस्थापन, इंजीनियरिंग आदि क्षेत्रात कमालीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या रोजगारांसाठी स्थानिकांचीच मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. याची पूर्व तयारी म्हणून रोजगारासाठी लागणाऱ्या कौशल्यांचे त्यांना खास प्रशिक्षण दिले जाईल. यासाठीच स्थानिक NGO कडून माहिती संकलनाचे काम सुरू आहे. कृपया त्यांना सहकार्य करावे. तसेच इच्छुक स्थानिकांनी प्रशिक्षणा करीता त्वरीत नाव नोंदणी करावी आणि या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा. छोट्या-मोठ्या रोजगार तसेच व्यवसायानिर्मितीमुळे JNPT चा आजूबाजूचा भाग आणि तेथे राहणाऱ्या स्थानिकांची प्रगती होवून जीवनमान ऊंचावले आहे, तसेच वाढवण बंदराच्या विकासामुळे या विभागातील स्थानिकाच्या जीवनातही या प्रकारेच बदल होतील असा आम्हाला विश्वास आहे.

## बंदर म्हणून वाढवणची निवड होणं ही भाग्याची गोष्ट :

भारतीय अर्थव्यवस्थेचा आलेख ऊंचावा, परदेशी व्यापाराला चालना मिळावी आणि स्थानिकांना नोकरी, व्यवसाय माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा या विचारानेच केंद्र आणि राज्य सरकारने, महाराष्ट्रातील पायाभूत प्रकल्पांमध्ये, मोठी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. याच धोरणांतर्गत अंदाजे 65,544 करोड (एकूण पासष्ठ हजार करोड़) रुपयांची गुंतवणूक करण्याची तयारी दाखवून भारत सरकारने पालघर मधील वाढवण बंदराच्या विकासाला परवानगी दिली आहे. JNPT आणि MMB सारख्या अनुभवी संस्था संयुक्तपणे या बंदराची उभारणी करतील.

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगाने वाढ होत आहे. त्यामुळे आधुनिक सोयींनी सुसज्ज अशा मोठ्या बंदराची गरज निर्माण झाली आहे. वाढवण येथील बंदराच्या विकासामुळे ही गरज पूर्ण होऊ शकेल. हे शक्य न झाल्यास आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर, व्यापारात इतर देशांपेक्षा मागे राहू. याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

वाढवण बंदर विकसित करण्यासाठी, तीन दशकांचा अनुभव असणारे 'JNPT' सारखे भारतातील सर्वात मोठे बंदर पाठीशी उभे आहे. बंदराच्या विकासामुळे स्थानिक रहिवाशांच्या दैनंदिन जगण्यावर कोणतेही वाईट परिणाम होणार नाही तसेच पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन होईल याची दक्षता घेतली जाणार आहे. एवढेच नाही तर स्थानिक रहिवाशांचा सामाजिक आणि आर्थिक विकास व्हावा तसेच त्यांचे आरोग्य चांगले रहावे या उद्देशाने विविध उपाय योजना राबविण्याची खात्री JNPT ने दिले आहे.

## भारतातील पहिल्या क्रमांकाच्या बंदराच्या देखरेखीत होणार वाढवण बंदराचा विकास

नवी मुंबई येथील न्हावा शेवा पोर्ट जे आता जवाहरलाल नेहरू पोर्ट म्हणून प्रसिद्ध आहे ते भारतातील पहिल्या क्रमांकाचे पोर्ट मानले जाते. याचे कारण म्हणजे भारतातील सर्व महत्त्वाच्या बंदरातून होणाऱ्या कंटेनरच्या एकूण मालवाहतुकींपैकी पन्नास टक्क्यांहून अधिक वाहतूक ही JNPT बंदरातूनच होते. 26 मे 1989 रोजी JNPT बंदर माल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आणि काही वर्षातच भारतातील सर्वात आधुनिक बंदर म्हणून आपली ओळख निर्माण केली. एवढेच नाही तर, कंटेनरची वाहतूक करणाऱ्या जगातील 100 बंदरांच्या यादीत JNPT हे बंदर 33 व्या क्रमांकावर आहे.

त्याकाळी मुंबई बंदरात वाहतुकीची कोंडी होऊ लागली म्हणून त्याला सहाय्यक बंदर अर्थात 'Satellite Port' म्हणून JNPT बंदराचा विकास करण्यात आला. मुंबई बंदराला कामगारांची कमतरता, समुद्र प्रवाहाची कमी प्रमाणात असलेली खोली, तसेच रस्ते आणि रेल्वेमार्ग जे मुंबई बंदराच्या आतील भागाशी जोडले होते, त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी आणि अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. परंतु तीन दशके JNPT ने मात्र सातत्याने आपल्या कार्यपद्धतीत व क्षमतेत सुधारणा करत बंदराला आतंरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिला आहे. JNPT चे सुद्धा नैसर्गिक मर्यादांमुळे पुढच्या विकासाचे मार्ग बंद झाले आहेत. एकेकाळी नवीन उद्योगांसाठी पोषक ठिकाण समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला तो मान पुन्हा मिळवून देण्यासाठी, नवीन अत्याधुनिक बंदराची निर्मिती करणे गरजेचं बनले आहे. त्यासाठी वाढवण बंदराहून उत्तम पर्याय असूच शकत नाही.

वाढवण बंदर
संधींचा अथांग सागर
सगळ्यांना अभिमान वाटेल अशी आंतरराष्ट्रीय दर्जाची वैशिष्टे
एकमेकांच्या साथीने करू उज्वल भविष्याकडे वाटचाल
तुमची आणि पर्यावरणाची काळजी घेणार बंदर
आयोजित केलेले आणि पूर्ण झालेले काही अभ्यास खालील प्रमाणे.
EVER USEFUL